# आकाशवाणी पुणे

## प्रादेशिक वृत्त विभाग

## पुणे वृत्तांत

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 22.03.2025** **वार- शनिवार**

---

**अन्न आणि औषधी प्रशासन**

पुणे शहरातील उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून रसवंतीगृह, ज्यूस सेंटर आणि लिंबू सरबतांच्या विक्रेत्यांनी बर्फ लादी घेताना परवाना धारक पुरवठादारांकडूनच खरेदी करावी, असं अन्न आणि औषधी प्रशासनाचे सहआयुक्त शिवकुमार कोडगिरे यांनी सांगितलं आहे. हलका आणि आरोग्याला हानीकारक बर्फ आढळल्यास कारवाई करणार असल्याचे त्यानी सांगितलं .

**कृषी विज्ञान केंद्र**

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे एआयमुळे उत्पादन खर्च कमी होऊन, उत्पन्नात वाढ होत असेल तर, आमचा तंत्रज्ञानाला विरोध नाही पण हे तंत्रज्ञान शेतकऱयांना परवडणारे पाहिजे, तसंच एफआरपी, एकरकमी न देणाऱ्या कारखान्यांवर कारवाई व्हावी, अशी मागणी साखर आयुक्तांकडे केली असल्याचं, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजु शेट्टी म्हटलं आहे. पुण्यातील कृषी विज्ञान केंद्रावर एआय तंत्रज्ञानाद्वारे केली जाणारी ऊस शेतीची पाहणी केल्या नंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

**जनजागृती**

जागतिक जल दिनानिमित्त, नागरिकांमध्ये पाण्याविषयी जनजागृती व्हावी, यासाठी आज एरंडवणे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीन, कर्वे रोडवरील गरवारे कॉलेज मेट्रो स्टेशन चौकामध्ये यावेळी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. पाण्याविषयी जनजागृती करणाऱ्या सूचना असलेले फलक दर्शवत कार्यकर्त्यांनी संदेश दिला.

**कर संकलन**

समाविष्ट गावांतील थकबाकीदारांवर कारवाई करू नये, असे आदेश राज्य शासनाने दिल्यामुळे आर्थिक वर्ष संपायला जेमतेम आठवडा शिल्लक असताना, पुणे महापालिकेच्या कर संकलनात उत्पन्न कमी झाल्याचा दावा मिळकत कर विभागाने केला आहे. महापालिकेकडून थकीत मिळकतकरासाठी कोणत्याही प्रकारची अभय योजना राबविली जाणार नाही. त्यामुळे मिळकतधारकांनी आपला कर आणि थकबाकी आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी भरावा, अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाईल, असा ईशारा पुणे महापालिका प्रशासनाने दिला आहे.

**पिंपरी चिंचवड**

करदात्यांना आपला कर भरण्यास सोयीचे व्हावे यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या करसंकलन विभागाने करसंकलन कार्यालये 29 मार्च पर्यंत सकाळी 9.45 ते रात्री 09 वाजेपर्यंत सुरु रहणार आहेत त्याच बरोबर, रविवार 30 मार्च, गुढीपाडव्याच्या दिवशी आणि 31 मार्च आर्थिक वर्षाचा शेवटच्या दिवशी रात्री 12 वाजेपर्यंत  सुरू राहणार आहेत .

**नवभारत साक्षरता**

केंद्र शासन पुरस्कृत ,उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत नोंदणी झालेल्या 6 लाख 66 हजार 128 असाक्षरांची पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी,उद्या रविवार 23 मार्च रोजी सकाळी 10 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये घेण्यात येणार आहे. परीक्षेला जाताना एक छायाचित्र, जन्मतारखेचा पुरावा म्हणून कोणतेही एक ओळखपत्र सोबत असण आवश्यक आहे.

**पुण्यभूषण**

अर्थशास्त्र क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल, यंदाचा 37 वा पुण्यभूषण पुरस्कार ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ आणि देशाचे धोरणात्मक सुधारक डॉ. विजय केळकर यांना जाहीर झाला असून त्रिदल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सतीश देसाई यांनी आज एका प्रसिध्दी पत्रकाव्दारे ही माहिती कळविली आहे. लवकरच होणाऱ्या पुरस्कार प्रदान सोहळ्यात कर्तव्य बजावत असताना, जखमी झालेल्या चार वीर जवानांचा आणि एका वीरमातेचा गौरव देखील करण्यात येणार असल्याचं पत्रकात म्हटलं आहे.

**महात्मा पुरस्कार**

राष्ट्रसेवा परिषद आणि मराठबोली पुणे यांच्यावतीने देण्यात येणारा महात्मा पुरस्कार, कामगार चळवळीचे नेते डॉक्टर बाबा आढाव यांना जाहीर झाला आहे. येत्या 5 एप्रिलला या पुरस्काराचे वितरण होणार आहे. या वेळी विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या 74 जणांचा ही सन्मानित करण्यात येणार आहे.

**कबड्डी**

ठाणे इथ खुल्या गटाची, राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा सुरू असून स्पर्धेत महिला गटात पुणे ग्रामीण संघाने सिंधुदुर्ग वर मात करत बाद फेरीत प्रवेश केला. मंदिरा देवकर आणि रेखा सावंत यांच्या खोल चढाया निर्णायक ठरल्या. पुरुष गटात  आदित्य शेळके आणि संदेश देवकुळे यांच्या खेळाच्या जोरावर पुणे शहर संघाने सिंधुदुर्ग संघावर मात केली.

**खेलो इंडिया**

नवी दिल्ली इथे सुरू असलेल्या दुसऱ्या खेलो इंडिया पॅरा स्पर्धात आज पुण्याच्या स्वरूप उन्हाळकर यान नेमबाजी प्रकारात सुवर्ण पदकाची कामगिरी साधली. त्यान पुरुष गटात 10 मीटर एअर रायफल स्टॅंडिंग एस एच 1 प्रकारात ही कामगिरी केली. स्वरूप माजी ऑलिंपियन असून पुण्यातील म्हाळुंगे बालेवाडी येथील क्रीडा संकुलात सराव करतो.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज दुपारी अंशतः ढगाळ वातावरण होतं.  कमाल तापमान 36 तर किमान तापमान 15 पूर्णांक 4 संश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही तापमानात फारसा बदल संभवत नसल्याचं पुणे वेधशाळेनं म्हटलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**